MHDH050001312024

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | २५.०१.२०२४ |
| नोंदणी दिनांक | : | २५.०१.२०२४ |
| निकाल दिनांक | : | २३.०३.२०२६ |
| कालावधी | : | ०२ व. ०१ म. २६ दि. |

## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, साक्री यांचे न्यायालय
## (पिठासीन अधिकारी मुग्धा एम. गांगुर्डे)

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२६/२०२४**
**निशाणी ३३**

नंदनी किशोर नाडेकर,
**वय :** २२ वर्षे, **व्यवसाय :** घरकाम,
**राहणार :** सावरखेडा, पो.पानखेडा,
ता.साक्री, जि. धुळे. **...अर्जदार**

**विरुध्द**

फुलसिंग झामरु सोनवणे,
**वय :** २५ वर्षे, **व्यवसाय :** शेती,
**रा.:** रायकोट (पिंजारझाडी),
ता.साक्री, जि.धुळे. **...सामनेवाला**

---

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १२५ अन्वये अर्ज**

---

अर्जदारातर्फे : विधीज्ञ श्री.ए.बी.गायकवाड.
सामनेवालांतर्फे : विधिज्ञ श्रीमती डी.बी.बागुल.

---

## <u>न्या य नि र्ण य</u>
## (पारित दिनांक २३ मार्च, २०२६)

. अर्जदाराने **फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १२५** अन्वये सामनेवालाकडून अर्जदार हिस दरमहा रक्कम रुपये १०,०००/–(अक्षरी रुपये दहा हजार मात्र) खावटी मिळण्यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

२. <u>अर्जदारांचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u>

अर्जदार व सामनेवाला क्र.१ चा विवाह रायकोट, ता.साक्री, जि.धुळे येथे झाला असून उभयतांना विवाह संबंधातून एकही अपत्य नसून त्यांचे विवाह संबंध अद्याप पावेतो कायम आहेत.

३. अर्जदाराचे पुढे कथन की, लग्नानंतर अर्जदार ही सामनेवाल्याकडे नांदणेस आली असता काही दिवस तिला ब–यापैकी नांदविले. त्यानंतर सामनेवाला हा अर्जदाराचा शारिरीक व मानसिक छळ करु लागला. अर्जदाराची सासु ही अर्जदारास सतत टोचून बोलत असे की, ‘तुझे आई वडील नंगचोट आहेत, भिकारी लोकांशी संबंध जुळलेला आहे.’ तसेच, अर्जदाराचे सासु–सासरे, जेठ–जेठाणी व नणंद हे अर्जदाराबाबत सामनेवाला यास खोटे नाटे सांगत असे की, ‘ही घरातील कामधंदा करत नाहीत, उध्दटपणे बोलते,हिची वागणुक चांगली नाही’ असे बोलून सामनेवाला याचे कान भरत असे. त्यांच्या चिथावनीला बळी पडून सामनेवाला हा अर्जदारास शुल्लक कारणाने बेदम मारहाण करित असे.

४. अर्जदाराचे पुढे कथन की, सामनेवाला हा पदोपदी अर्जदाराच्या चारित्र्यावर संशय घेत असे. अर्जदार कोणाशी बोलली असता किंवा कोणाकडे बघीतले असता ‘तुझे आणि त्याचे लफडे आहे’ असा संशय घेवुन अर्जदारास ‘रांड, गधडी’ असे गलीच्छ भाषेत शिवीगाळ करुन मारहाण करित असे. अर्जदाराची सासु ही सांगत असे की, ‘हिची लायकी नव्हती घरात येण्याची माकड तोंडाची, तुझेमुळे आमच्या घराणेची ईज्जत गेली.’ अर्जदाराचे सासु–सासरे, जेठ–जेठाणी व नणंद हे अर्जदारास शिळे अन्न

खायला देत असे. अर्जदाराच्या खाण्यापिण्याची आबाळ करित असे. तुला जास्त खायला लागते असे म्हणून जेवणाचे ताट हिसकावुन घेत असे.

५. अर्जदाराचे पुढे कथन की, सामनेवाला हा अर्जदारास म्हणत असे की, 'तुझे आईवडीलांनी आम्हाला पाहिजे तेवढा हुंडा दिला नाही, भिकारडयासारखे लग्न लावुन दिले. लग्नातु आम्हाला व आमच्या नातेवाईकांना काहीच मानपान दिला नाही. तसेच, मनासारखे लग्न काढून दिले नाही व लग्नात खर्च केला नाही. अर्जदाराची सासु अर्जदारास सांगत असे की, माझे मुलास काहीतरी मोठा व्यवसाय चालू करायचा आहे म्हणून तु तुझे माहेरुन व्यवसायासाठी रक्कम रुपये १,००,०००/–घेवुन ये.' त्यावेळी अर्जदाराने सामनेवाला यांना समजाविण्याचा प्रयत्न केला असता त्याचा राग येवुन सामनेवाला याने अर्जदारास बेदम मारहाण केली.

६. अर्जदाराचे पुढे कथन की, सामनेवाला हा कधी कधी दारु पिवुन येत असे व अर्जदारास मारहाण करित असे. सामनेवाला हा अर्जदारास कांदे चाळ येथे कामाला घेवुन जात असे. त्यामुळे, काही दिवसानंतर अर्जदाराची तब्येत बिघडली असता सामनेवाला यांनी तिच्याकडे लक्ष दिले नाही. त्यानंतर, अर्जदाराने फोन करुन सर्व हकीकत तिच्या वडीलांना सांगीतली. त्यानंतर अर्जदाराचे वडील आले व त्यांनी तिला पिंपळनेर येथील खाजगी दवाखान्यात नेले. त्यानंतर अर्जदार ही पुन्हा सामनेवाला यांच्याकडे आली असता सामनेवाला हा सतत तिला त्रास देत असे.

७. अर्जदाराचे पुढे कथन की, दिनांक २५.१२.२०२३ रोजी घरात स्वयंपाक व्यवस्थीत झाला नाही म्हणून अर्जदाराच्या सासुने अर्जदारास शिवीगाळ करुन मारहाण केली. तसेच, अर्जदाराच्या सासु–सासरे, जेठ–जेठाणी व नणंद हे अर्जदारास म्हणू लागले की, 'हिची मार खायचीच लायकी आहे.' त्यानंतर, सायंकाळी सामनेवाला आल्यावर अर्जदाराचे सासु–सासरे, जेठ–जेठाणी व नणंद यांनी अर्जदाराबद्दल वाईट वाईट बोलून 'ही जास्त मातली आहे, हिला घरात राहू देवु नकोस' असे सांगून सामनेवाला याने अर्जदारास बेदम मारहाण करुन तिला घराच्या बाहेर काढून दिले.

८. अर्जदाराचे पुढे कथन की, सामनेवाला याने कोणतेही संयुक्तीक कारण नसतांना स्वतःहून अर्जदारास मानसिक आणि शारिरीक छळ करुन तीचा त्याग केला तसेच दरम्यानच्या काळात सामनेवाला याने अर्जदाराच्या पालनपोषणाची, औषधोपचाराची आणि उदरनिर्वाहाची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. अर्जदार ही स्वतःचे पालन पोषण करण्यास असमर्थ आहे. उलटपक्षी सामनेवाला हा शेती/मजुरी काम करुन त्याच्यापासून त्यांना चांगले उत्पन्न मिळते. तसेच, सामनेवाला हा बाहेर राहून चांगले प्रकारे पैसे कमवितो. सामनेवाला याचेवर कोणतीही जबाबादारी नाही. त्यामुळे, सामनेवाला याने अर्जदारास दरमहा रक्कम रुपये १०,०००/–खावटी मिळावी म्हणून अर्जदाराने प्रस्तुत अर्ज दाखल केला.

९. सामनेवाला याने **निशाणी २४** अन्वये म्हणणे दाखल करुन अर्जदारासोबतचे नातेसंबंध कबुल करुन अर्जातील उर्वरित सर्व कथन व आरोप विवेक्षितपणे नाकारले. उलटपक्षी सामनेवालाचा बचाव की, लग्नानंतर अर्जदार ही दोन महिनेपावेतो सामनेवाल्याकडे एकत्र कुटुंबात राहिली. सामनेवाला यास नोकरी नव्हती म्हणून अर्जदाराचे सामनेवाल्याचे एकत्र कुटुंबात चित्त लागत नव्हते. म्हणून, अर्जदार ही सामनेवाल्यास म्हणत असे की, 'मी एकत्र कुटुंबात राहणार नाही, मला तुमचे घरचे घरातील काम लावता, मला काम लावायचे नाही, मी तुमची नोकराणी नाही, माझे वडील हे मोठे पैसेवाले व मोठे पुढारी आहेत. तुम्ही माझे माहेरी चला, तिथेच माझेसोबत घरजावाई म्हणून रहा. तुम्ही जर माझेसोबत आला नाहीत तर मी तुमचा संसार करणार नाही' असे सांगत असे.

१०. सामनेवाला याचा पुढे बचाव की, सामनेवाला हा बराचवेळा अर्जदारास समजावुन सांगत असे की, 'मी माझे म्हता–या आईवडीलांना सोडून तुझे माहेरी घरजावाई म्हणून येऊ शकत नाही.' परंतु, अर्जदार हिने ऐकले नाही. त्यानंतर सामनेवाल्यास नाईलाजाने अर्जदारासोबत सन २०२२ मध्ये अर्जदाराचे हट्टापायी सामनेवाला यास उमरे, ता.साक्री, जि.धुळे येथे शेतमजुर म्हणून तुटपुंज्या मानधनावर

काम करु लागला. परंतु, त्याठिकाणी देखील अर्जदार हिचे मन लागले नाही. त्यामुळे, अर्जदार हिने माहेरी जाण्यासाठी हट्ट धरला व सामनेवाला यास काहीएक न विचारता अर्जदार हिने तिच्या वडीलांना बोलावुन वडीलांसोबत माहेरी निघून गेली.

**११.** सामनेवाला याचा पुढे बचाव की, सामनेवाला हा अर्जदारास भेटण्यास व देवीच्या दर्शनास अर्जदारासोबत नानीस, ता.जि.रायगड येथे घेवुन गेला व देवदर्शनानंतर अर्जदार व सामनेवाला हे अर्जदाराच्या माहेरी गेले. तेथे सामनेवाला याने अर्जदारास परत उमरे येथे बोलावले असता अर्जदार ही सामनेवाला यास म्हणाली की, ‘माझी तब्येत काही ठिक नाही, तु जा मी आली काही दिवसात.’ त्यानंतर सामनेवाला हा नाईलाजाने कामासाठी निघून गेला. काही दिवसांनी सामनेवाला याचे आई वडील हे अर्जदारास घेण्यासाठी तिचे माहेरी गेले असता अर्जदार हिने परत येण्यास नकार दिला व म्हणाली की, ‘माझी मर्जी राहिल तेव्हा मी येईल, मी काही तुमची नोकराणी नाही की, तुमच्या घरी रायकोट येथे येवुन काम करु.’

**१२.** सामनेवाला याचा पुढे बचाव की, त्यानंतर सामनेवाला याने अर्जदारास फोन केला असता अर्जदार म्हणाली की, ‘तु मला विचारपुस करणाारा कोण, माझी मर्जी राहिल तर मी येईल, तुला पटत नसेल तर मला फारकती देवुन टाक.’ त्यानंतर, काही दिवसांनी पुन्हा सामनेवाला याचे आईवडील अर्जदारास घेण्यासाठी तिच्या माहेरी आले असता अर्जदाराचे आईवडील म्हणू लागले की, ‘तुम्ही पंचांना घेवुन या तेव्हाच आमची मुलगी तुमच्याकडे नांदण्यास येईल.’ त्यानंतर, एक महिन्यांनी सामनेवाला व रायकोट गावाचे सरपंच व पोलीस पाटील यांना घेवुन अर्जदाराच्या माहेरी गेले असता अर्जदाराचे वडील म्हणू लागले की, ‘तुम्ही आमच्या मुलीला तुमच्या घरी मोलकरीण सारखे काम लावतात, आम्हाला आमच्या मुलीला पाठवायचे नाही, तुम्ही आम्हाला रक्कम रूपये ७,००,०००/–दया व आमच्या मुलीला फारकती देवून टाका.’

**१३.** सामनेवाला याचा पुढे बचाव की, सामनेवाला व त्याच्या आईवडीलांनी अर्जदारास नांदायला आणण्यासाठी स्वत: व नातेवाईकांमार्फत बराच प्रयत्न केला.

परंतु, अर्जदार ही नांदण्यास आली नाही. सामनेवाला याने अर्जदाराचा कधीही कोणताही कौटुंबिक छळ केलेला नसून अर्जदार स्वतःहून माहेरी राहत आहे, सामनेवाला आजही अर्जदारासोबत विनाशर्त संसार करण्यास तयार आहे. सामनवोला यास कोणत्याही प्रकारची कायमस्वरुपी नोकरी नाही. सामनेवाला यांच्याकडे कुठलीही स्थावर व जंगम मालमत्ता नाही. सामनेवाला हा शेतमजुर म्हणून मौजे उमरे, ता.साक्री, जि.धुळे येथे काम करत आहे. सामनेवाल्यावर त्याच्या वयोवृध्द आई वडीलांच्या पालनपोषणाची व औषधोपचाराची जबाबदारी आहे. त्यामुळे, तो अर्जदारास स्वतंत्र खावटी देण्यास असमर्थ आहे. अर्जदाराने कोणतेही कारण नसतांना सामनेवाला याचा त्याग केलेला असल्यामुळे सामनेवाला हा अर्जदारास खावटी देणे लागत नाही. सबब अर्ज नामंजुर करण्यात यावा, अशी त्यांनी विनंती केली.

**१४.** अभिलेखावर आलेला दोन्ही बाजुंचे कथने, बचाव आणि साक्ष व दस्त पुरावा लक्षात घेता उचित निर्णयापर्यंत पोहचण्याकरीता खालील मुद्दे विचारार्थ येतात, सदर मुद्दयांवर सुसंगत कारणमिमांसेसह निष्कर्ष नोंदविण्यात आले ते खालीप्रमाणे –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सामनेवाल्याने अर्जदारास जाणुन बुजून दुर्लक्षीत केल्याची बाब अर्जदार शाबीत करते काय ? | **...होय.** |
| २. | सामनेवाल्याकडे उत्पन्नाचे साधन असल्याची बाब अर्जदार सिध्द करते काय ? | **...होय.** |
| ३. | अर्जदार स्वतःचा सांभाळ करण्यास असमर्थ असल्याची बाब अर्जदार सिध्द करते काय ? | **...होय.** |
| ४. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## पुरावा

१५. अर्जदाराने अर्जातील कथने व सामनेवालांविरुध्दचे आरोप शाबीत करण्यासाठी स्वतःला **निशाणी १२** अन्वये तपासले असून **निशाणी १५** अन्वये मालमत्ता व दायीत्वाचे शपथपत्र दाखल केले आहे. तसेच, दस्त पुरावा म्हणून अर्जदाराने झामरु गंगाराम भिल व भरत गंगाराम भिल यांचे नावे असलेल्या तीन ७/१२ उतारे **निशाणी १९ ते २१** अन्वये दाखल केले आहेत. तसेच, **निशाणी २२** अन्वये अर्जदाराने पुरावा बंद पुरशिस दाखल केली.

१६. अर्जदाराने तीच्या सरतपासाच्या शपथपत्रामध्ये अर्जातील कथनाचा पुनरुच्चार केल्याचे दिसून येते. अर्जदाराचा सामनेवालातर्फे उलट तपास घेण्यात आला. उलट तपासादरम्यान अर्जदाराने मान्य व कबुल केले की, तिला मराठी लिहिता वाचता येते, अर्जात नमुद केलेली रक्कम रुपये एक लाखाची मागणी केव्हा केली याबाबत तिला सांगता येणार नसून सामनेवाल्याच्या वडीलांनी तसे सांगीतले होते व सदर मागणीबाबत व तिच्या सासु–सासरे, जेठ जेठाणी व नणंद यांनी मारहाण केली याबाबत त्यांनी पोलीस स्टेशनला तक्रार केली नव्हती, सामनेवाला मजुरीचे काम करतो, सामनेवाला तिला नांदविण्यास घेवुन जाण्यास तयार असला तरी ती जाण्यास तयार नसल्याचे कथन केले. सामनेवालातर्फे विचारण्यात आलेले उर्वरित सर्व सुचक प्रश्न अर्जदाराने तंतोतंत नाकारले.

१७. अर्जदाराचे आरोप व कथने खोडून काढण्यासाठी सामनेवाला याने स्वतःला **निशाणी २९** अन्वये तपासले असून **निशाणी ३१** अन्वये त्याचे मालमत्ता व दायित्वाचे प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. **निशाणी २९** अन्वयेच्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्राचे अवलोकनार्थ असे दिसून येते की, सामनेवाला याने त्याच्या बचावाच्या कथनांचा पुनरुच्चार केलेला आहे. अर्जदारातर्फे सामनेवाला याचा उलट तपास घेण्यात आला.

१८. अर्जदारातर्फे उलट तपासादरम्यान सामनेवाला याने मान्य व कबुल केले की, त्यांचे एकत्र कुटुंब असून त्याच्या कुटुंबात त्याचे आईवडील, भाउ बहिण असून त्यांची शेती असून सकाळी लवकर उठुन कामाला जावे लागते, **निशाणी १९ ते २१** वरील ७/१२ उता–यांमध्ये त्याच्या वडीलांचे व काकांचे नाव नमुद असून तो मजुरी काम करतो व अर्जदार तिच्या उदरनिर्वाहासाठी काम करते किंवा नाही हे त्याला माहित नाही. तसेच अर्जदारातर्फे विचारण्यात आलेले उर्वरीत सुचक प्रश्न सामनेवाला याने तंतोतंत नाकारले. तसेच सामनेवाला यांनी **निशाणी ३२** अन्वये पुरावा बंद केला. अर्जदारातर्फे विधिज्ञ श्री.ए.बी.गायकवाड आणि सामनेवालांतर्फे विधिज्ञ श्रीमती डी.बी.बागुल यांचा युक्तीवाद ऐकला.

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दा क्र.१ करिता –</u>

१९. उभयंतांचा अभिलखावरील आलेला एकंदरीत पुरावा लक्षात घेता उभयंतांना त्यांचा विवाहसंबंध मान्य व कबुल आहे. त्यामुळे, त्यांच्यातील विवाहसंबंध वादातीत नाही. अर्जदाराचे कथन की, सामनेवाला याने अर्जदाराचा मानसिक, शारिरीक छळ करुन कोणतेही संयुक्तीक कारण नसतांना स्वत:हून त्याग केला असून तिच्या पालन पोषणाची अथवा उदरनिर्वाहाची कोणतीही व्यवस्था केलेली नाही.

२०. उलटतपासादरम्यान सामनेवाला याने मान्य व कबुल केले की, अर्जदार तिच्या उदरनिर्वाहासाठी काम करते किंवा नाही हे त्याला माहिती नाही. तसेच, उलटतपासादरम्यान सामनेवाला याने मान्य व कबुल केले की, अर्जदारास नांदविणेकामी त्याचे आईवडील अनेक वेळा अर्जदारास घेण्यास गेले, मात्र त्याची तारीख त्याला सांगता येणार नसून त्याचे आईवडील, पोलीस पाटील, सरपंच व गावातील इतर सात ते आठ लोक गेल्याचे मान्य व कबुल केले व सदर बाब सिध्द करणेकामी तो उपरोक्त साक्षीदारांना तपासण्यास तयार असून कोणत्या दिवशी गेले होते, त्याची तारीख त्याला माहिती नाही. मात्र, अभिलेखाचे अवलोकनार्थ सामनेवाला याने स्वत: व्यतिरिक्त इतर

स्वतंत्र साक्षीदार तपासला नाही. याठिकाणी असे नमुद करावेसे वाटते की, उभयंतांमध्ये वैवाहीक वाद असल्याने अर्जदार सामनेवाल्यापासून विभक्त राहत असल्याची बाब अभिलेखावर आलेली आहे. सामनेवाल्यापासून विभक्त राहिल्यापासून अर्जदाराच्या उदरनिर्वाहाची व पालन पोषणाची जबाबदारी पती म्हणून सामनेवाला याचेवर होती व त्याबाबत सामनेवाल्याने काय पुर्तता केली व काय नियोजन केले याबाबत सामनेवाल्याने त्याच्या बचावामध्ये कुठेही कथन केले नसून तसा ठोस दस्त अथवा साक्ष पुरावा देखील अभिलेखावर आलेला नाही. उलटतपासादरम्यान सामनेवाला मान्य व कबुल करतो की, अर्जदार तिच्या उदरनिर्वाहासाठी काम करते किंवा नाही हे त्याला माहित नाही. तसेच, याठिकाणी हेही दुर्लक्षीत करुन चालणार नाही की, अर्जदार सामनेवाल्यापासून विभक्त राहत असल्यामुळे अर्जदारास प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. यावरुन असे दिसून येते की,सामनेवाल्याने अर्जदारास जाणुन बुजून दुर्लक्षीत केल्याची बाब अभिलेखावर अर्जदाराने यशस्वीरित्या आणलेली आहे. त्यामुळे, **मुद्दा क्र.१** चा निष्कर्ष **होकारार्थी** नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करिता –</u>**

**२१.** अर्जदाराचे पुढे कथन की, सामनेवाला हा शेती/मजुरी करतो व त्यापासून त्याला चांगले उत्पन्न मिळते व सामनेवाला हा बाहेर राहून चांगल्या प्रकारे पैसे कमवितो. उलटतपासादरम्यान सामनेवाला याने मान्य व कबुल केले की, **निशाणी १९ ते २१** वरील मिळकतींचे ७/१२ उता–यांवर त्याच्या वडीलांचे व काकांचे नाव नमुद आहे. तसेच, सदर उता–यांचे अवलोकनार्थ असे दिसून येते की, त्यामध्ये मका, नागली, सोयाबीन, कांदा असे पीक असून दोन मिळकतींमध्ये विहिर असल्याचे दिसून येते. त्यामुळे, सदर तिन्हीही शेत मिळकतीपासून सामनेवाल्यास उत्पन्न असल्याची बाब अभिलेखावर अर्जदाराने यशस्वीरित्या आणलेली आहे. तसेच, सामनेवाल्याने उलटतपासादरम्यान मान्य व कबुल केले की, तो मजुरी काम करतो. यावरुन देखील

असे म्हणणे वावगे ठरणार नाही की, सामनेवाल्यास पुरेसे उत्पन्नाचे साधन आहे. त्यामुळे, **मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष होकरार्थी नोंदवित** आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ३ करीता –</u>**

**२२.** अर्जदारातर्फे विधिज्ञ श्री.ए.बी.गायकवाड यांनी युक्तीवादादरम्यान सांगितले की, अर्जदार ही स्वतःचा सांभाळ करण्यास असमर्थ आहे. मात्र, अर्जदार ही स्वत:चा सांभाळ करण्यास समर्थ असल्याचा बचाव सामनेवाल्याने अभिलेखावर आणला नाही. तसेच, उलटतपासादरम्यान सामनेवाल्याने मान्य व कबुल केले की, अर्जदार तिच्या उदरनिर्वाहासाठी काम करते किंवा नाही हे त्याला माहित नाही. त्यामुळे, उपरोक्त विवेचनावरुन अर्जदार ही स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असल्याचे सिध्द केले आहे. सबब **मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित** आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ४ करीता</u>**

**२३.** **मुद्दे क्र.१ ते ३** बाबत दिलेल्या निष्कर्षांचा विचार करता, सामनेवालाने अर्जदाराचा सांभाळ करण्यास जाणुनबुजून दुर्लक्ष केलेले आहे, तसेच अर्जदार ही स्वतःचा सांभाळ करण्यास असमर्थ आहे व सामनेवाल्यास उत्पन्नाचे साधन आहे या सर्व बाबी अभिलेखावरुन सिध्द होतात. सामनेवालाच्या शारिरीक क्षमतेचा आणि त्याला मिळणा–या उत्पन्नाचा विचार करता, अर्जदार सामनेवाल्याकडून पोटगी मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जात अर्जदारास सामनेवालाकडून अर्ज दाखल तारखेपासून रक्कम रुपये ३,०००/– पोटगी व निवा–यापोटी एकत्रीत देण्याचा आदेश पारित करणे न्यायोचित होईल. तसेच, अर्जदाराने सामनेवाला विरुध्द कौटुंबीक हिंसाचार कायदा अन्वये फौजदारी किरकोळ अर्ज नं.२३/२०२४ अन्वये दाखल केला असून सदरचा अर्ज अंशत: मंजुर झाल्याने अर्जदारास प्रस्तुत प्रकरणात रक्कम रुपये ३,०००/–अन्न, वस्त्र व निवा–यापोटी देणे न्यायिक व उचित राहील. सबब **मुद्दा क्र.४** च्या निष्कर्षादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज हा अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. सामनेवालास निर्देश देण्यात येते की, त्याने अर्जदारास प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून दरमहा रक्कम रुपये २,०००/–(अक्षरी रुपये दोन हजार मात्र) पोटगी व अन्न, वस्त्र आणि निवा–यापोटी म्हणून द्यावी.

३. सामनेवालास निर्देश देण्यात येते की, त्याने अर्जदारास प्रस्तुत अर्जाच्या खर्चापोटी रक्कम रुपये २,०००/– (अक्षरी रुपये दोन हजार मात्र) द्यावे.

४. सदर आदेशाची प्रत अर्जदार आणि सामनेवालास विनामोबदला देण्यात यावी.

**न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.**

MUGDHA MUKUND GANGURDE
Digitally signed by MUGDHA MUKUND GANGURDE
Date: 2026.03.25 12:20:00 +0530

साक्री.
दिनांक : २३.०३.२०२६.

**(मुग्धा एम. गांगुर्डे)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, साक्री**